# पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर
## प्रेस नोट दि.२४/०८/२०१९
## दि.२३/०८/२०१९ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

**भाग-१ ते ५ चे गुन्हे**

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | डेक्कन पो स्टे २५७/१९,भादविक ३६४(अ),३६७,३९४,३२३,५०४,५०६,३४ सावकारी अधिनियम सन २०१४ चे कलम ४४,४५ |
| **फिर्यादी** | एक पुरुष, वय- ४५ वर्षे, रा.वारजे,पुणे |
| **आरोपी** | १)सुजित जेठमल सोलंकी, वय ३९ वर्षे, रा.कर्वेरोड, नळस्टॉप दुरध्वनी केंद्रा जवळ,पुणे २) राजु शिवाजी मेटकरी, वय २२ वर्षे, रा.साई मंदिरा समोर, जनता वसाहत,पुणे ३)एक अनोळखी साथीदार (अ.क्र.१ व २ अटक) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२२/०८/२०१९ रोजी दुपारी ०३/०० वा ते सांय.०६/४५ वा.चे दरम्यान बाहेती क्रिएशन या नावाने एरंडवणा, कर्वे रोड पुणे येथे |
| **तपशिल** | वर नमुद ता.वेळी ठिकाणी फिर्यादी यांनी व्यापारासाठी त्यांचे ओळखीच्या रणजित सोलंकी याचे ओळखीने उधारीवर घेतलेल्या मालाच्या पैशाची परत फेड केली नाही या कारणावरून यातील नमुद इसमांनी, फिर्यादी यांना प्रथम जबरदस्तीने मोपेड दु.चाकी वरून व नंतर कार मधुन घेवुन जाताना, हाताने मारहाण करून,शिविगाळ करून,उरवडे तेथ्रील शेतामध्ये नेले. तेथे सुजितने फिर्यादी यांना हॉकी स्टीकने मारहाण केली तसेच एका इसमाने लोखंडी पाईपने मारहाण केली.फिर्यादी यांना पकडुन आणलेल्या दुस-या इसमानेही हाताने लाथांनी व दगडाने मारहाण केली. तसेच त्यांचे पैकी एकाने त्याच्या हाताची बोटे जोराने फिर्यादी यांच्या डोळयामध्ये घातली व जखमी केले तसेच डावे हाताचे मधील बोट फॅक्चर केले आहे व डोळयाने अस्पष्ट दिसु लागले आहे. सुजितने धाक दाखवुन जबरदस्तीने फिर्यादी यांचेकडील मोबाईल व मोपेडची चावी असा एकुण ५,२००/- रूपयेचा माल काढुन घेतला. त्यानंतर फिर्यादी यांना कृष्णा हॉस्पिटलच्या जवळ रोडवर सांय. ०६/४५ वा. सोडून ते निघून गेले. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. कोळंबीकर ९४०४९०१११ |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | चतुश्रृंगी पो स्टे ७३८/१९,भादविक ४५७, ३८० |
| **फिर्यादी** | अर्जुन दिवगी, वय २० वर्षे, रा.बाणेर रोड, पुणे, |
| **आरोपी** | अज्ञात |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२२/०८/२०१९ रोजी रात्री २३.३० वा ते दि.२३/०८/२०१९ रोजी पहाटे ०५.०० वाजेच्या दरम्यान २७३/१/२ ओमकार बंगलो, कॉर्पोरेशन बँकेच्या पाठीमागे, बाणेर रोड, पुणे.येथे. |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचा राहता बंगला कुलुप लावुन बंद असताना,कोणीतरी अज्ञात इसमाने त्यांचे राहते घराचे खिडकीची ग्रील कशाच्यातरी तरी सहायाने उचकटुन,त्यावाटे आंत प्रवेश करून, कपाटातील १५,०००/- रोख रक्कम व ८०० युरो व १००० डॉलर विदेशी करन्सी असा ऐवज घरफोडी चोरी करून नेला. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. बी. व्ही. दोडमिसे ९५०३७५८२८४ |

३

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | चतुःश्रृंगी पो स्टे ७३४/१९,भादविक ४१९, ४२०, माहिती तंत्रज्ञान अधि. ६६(डी) |
| **फिर्यादी** | एक पुरुष, वय-६२ वर्षे, रा. बालेवाडी, पुणे. |
| **आरोपी** | अज्ञात मोबाईल धारक (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२१/०५/२०१९ रोजी ते दि.२१/०८/२०१९ रोजी पर्यंत ए-१, ५०४, साई कॅनरी, गोल्डन स्ट्रीट, बालेवाडी, पुणे. |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांनी ग्रुफर या वेबसाईट वरुन ऑर्डर दिली. परंतु वस्तु न मिळाल्याने गुगल वरुन कंपनीचा संपर्क क्रमांक घेतला व संपर्क केला असता अज्ञात व्यक्तीने ग्रुफर या |

कंपनीचा इंचार्ज असल्याचे सांगुन पैसे रिफंड करतो असे सांगुन एनीडेस्क हे ॲप डाऊनलोड करायला सांगुन तसेच मोबाईलचा ॲक्सेस मिळवुन घेवुन, एसबीआय चे क्रेडीट कार्ड वरुन व आयडीबीआय बँकेचे डेबीटकार्ड वरुन एकुण ३७,९९८/- रु.ची फसवणुक केली आहे.

**त.अंमलदार** पो.निरी. वैशाली गलांडे ९०११०३७७६२

**४**

**पो.स्टे.गुरनं./कलम** बंडगार्डन पो स्टे ३५६/१९,भादविक ३५३,५०४

**फिर्यादी** स्वप्ना यादव, वय ३२ वर्षे,रा.बि.जे. मेडीकल मुलींचे वस्तीगृह,चर्च रोड,पुणे

**आरोपी** कार चालक (अटक नाही)

**गु.घ.ता.वेळ व ठिकाण** दि.२३/०८/२०१९ रोजी १३/३० वा.चे सुमारास ससुन हॉस्पिटलचे एक्झीट गेट पुणे येथे

**तपशिल** यातील फिर्यादी हया वैदयकीय अधिकारी या पदावर कार्यरत असुन, त्यांचेकडे ससुन हॉस्पिटलच्या परिसरातील पार्किंग व्यवस्था, वाहनाचे प्रवेश व त्या संबंधीची शिस्त त्यात खाजगी वाहने तसेच ॲम्बुलन्स व इतर ससुनचे शासकीय वाहने इत्यादी संबंधीचे कामे त्या पाहतात. वर नमुद केले ता.वेळी व ठिकाणी, यातील फिर्यादी हया वाहन व्यवस्थे संबंधीची पाहणी करत असताना ससुन हॉस्पिटलचे एक्झीट गेटने फॉक्स वॅगन कार चालकाने त्याची कार आत घेतली व सिक्युरीटी गार्डशी वाद घातला यावर फिर्यादी हया सदर कार चालकास त्यांची ओळख देवुन समजवण्याचा प्रयत्न करत असताना, त्याने फिर्यादी यांचे अंगावर धावून येवुन, शिवीगाळ करुन, फिर्यादी हया करीत असलेल्या शासकीय कामात अडथळा निर्माण केला आहे.

**त.अंमलदार** सहा.पो.निरी. पाटील ९५९४०००११८

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**